26 MAY 2025 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जैवविविधता टिकवून ठेवणे काळाची गरज

## कुलसचिव डॉ. शिंदे; 'अवनि'च्या अरुणोदय पुरस्काराने संपतराव पवार सन्मानित



कोल्हापूर : ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संपतराव पवार यांना अरुणोदय पुरस्काराने सन्मानित करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व व्यंकाप्पा भोसले. सोबत प्रा. रसिया पडळकर, ज्योती म्हापसेकर, जयसिंगराव कदम, प्रा. संजय पाटील आदी. (छाया : मिलन मकानदार)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

स्वार्थाची संस्कृती स्वीकारली जात आहे. स्वार्थ आमच्या नसानसात भिनला आहे. अन्न, वस्त्र, निवारा आपल्या गरजा आहेत, असे आपण मानतो; पण अन्न, हवा, पाणी या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. भविष्यात जैवविविधता टिकवून ठेवणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. हॉटेल ओपल येथे पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दलितमित्र व्यंकाप्पा भोसले होते.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भाई संपतराव पवार यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह, मानपत्र देऊन अरुणोदय पुरस्काराने गौरवण्यात आले.

डॉ. शिंदे म्हणाले, जैवविविधतेचे महत्त्व नव्या पिढीने गांभीर्याने घेतलेले नाही. याचा गंभीर फटका बसू शकतो. त्यामुळे नव्या पिढीला जैवविविधतेचे महत्त्व पटवून आणि समजावून सांगणे महत्त्वाचे आहे.

संपतराव पवार म्हणाले, संस्थेबरोबर व्यक्तीनेही झोकून देऊन काम करावे लागेल. 'अवनि' संस्था समाजातील शेवटच्या घटकाला सामर्थ्य देण्याचे काम करत आहे.

प्रा. रसिया पडळकर म्हणाल्या, हवामान समजून घेणे आणि त्याच्याशी जुळवून घेणे हे मानवा समोर मोठे आव्हान आहे. स्त्री मुक्ती संघटनेच्या अध्यक्षा ज्योती म्हापसेकर म्हणाल्या, संस्थात्मक व संघटनात्मक काम जितके महत्त्वाचे आहे, तितकेच व्यक्तीने देखील जबाबदारीने वागले पाहिजे. व्यंकाप्पा भोसले म्हणाले, आम्ही भटक्यांची चळवळ उभा केली. उपेक्षितांना न्याय मिळवून देण्यासाठी काम करत आहे. आपली चळवळ ही सर्वांसाठी असली पाहिजे.

प्रास्ताविक संस्थेच्या अध्यक्षा अनुराधा भोसले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय जयसिंगराव कदम यांनी करून दिला. सूत्रसंचालन पंडित कंदले यांनी केले.

26 MAY 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विकासाची मांडणी पर्यावरणपूरक व्हावी

## संपतराव पवार : 'अवनि'तर्फे 'अरुणोदय पुरस्कार' प्रदान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : 'समाजावर येणारी संकटे ही संधी असतात. संकटे ही मनुष्याला विकासाच्या दृष्टीने विचार करायला भाग पाडतात. त्यामुळे विकासाचा पाया हा संकटामधूनच घडत असल्याने कोणतेही संकट पेलताना विकासाची पर्यावरणपूरक मांडणी केली पाहिजे,' असे मत बलवडी (ता. खानापूर, जि. सांगली) येथील बळीराजा प्रकल्पाचे संपतराव पवार यांनी व्यक्त केले. अवनि संस्थेतर्फे सामाजिक कार्यकर्ते व्यंकाप्पा भोसले, स्त्रीमुक्ती संघटनेच्या अध्यक्षा ज्योती म्हापसेकर, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते त्यांना आज 'अरुणोदय' पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी प्रा. डॉ. रसिया पडळकर, 'अवनि'च्या अध्यक्षा अनुराधा भोसले, उपाध्यक्ष संजय पाटील व मानद सचिव प्रा. जयसिंग कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. डॉ. रसिया पडळकर यांनी 'हवामान बदलाशी जुळवून घेताना' या विषयावर मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, 'सध्या काही देशांमुळे हवामान बदलाचे गंभीर परिणाम



कोल्हापूर : अवनि संस्थेतर्फे अरुणोदय पुरस्कार संपतराव पवार यांना प्रदान करताना व्यंकाप्पा भोसले. सोबत डावीकडून प्रा. जयसिंग कदम, ज्योती म्हापसेकर, प्रा. डॉ. रसिया पडळकर, डॉ. व्ही. एन. शिंदे, अनुराधा भोसले व संजय पाटील. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

### पर्यावरणदिनी उत्सव पुनर्चक्रीकरणाचा

■ सध्या कचरा एकत्र संकलित करून फेकला जातो. मात्र, याच कचऱ्याचा वापर करून अनेक उपयोगी वस्तू बनवता येतात, हा मुद्दा चर्चेला आल्यानंतर अनुराधा भोसले यांनी यंदाच्या पर्यावरणदिनी कोल्हापुरातील पर्यावरणप्रेमी संस्था पुनर्चक्रीकरणाचा उत्सव करणार असल्याचे सांगितले. ज्यांच्याकडे पुन्हा वापरता येईल, असा कचरा असेल त्यांनी पाच ते आठ जूनदरम्यान शाहू स्मारक परिसरात आणून देण्याचे व अशा कचऱ्यापासून बनविण्यात येणाऱ्या वस्तू पाहण्याचे आवाहन यावेळी केले.

भोगावे लागत आहेत. भारताचा यामध्ये कमी टक्का असला तरी परिणाम सहन करण्यामध्ये भारत चौथ्या क्रमांकावर आहे. जागतिक पातळीवर हवामान बदलावर राजकारण होत राहील, मात्र स्थानिक पातळीवर उपाययोजना करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेतला पाहिजे.'

ज्योती म्हापसेकर म्हणाल्या, ''प्रत्येकाने आपला कचरा-आपली जबाबदारी ओळखून कचऱ्याचे योग्य वर्गीकरण केले पाहिजे. तसेच नगरपालिका, महापालिकेनेही तो वेगळाच संकलित केला पाहिजे. तर कचऱ्याचे डोंगर साचणार नाहीत आणि मिथेनसारखा विषारी वायू निर्माण होणार नाही.' डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी 'पाणी-वाणी' या विषयावर मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले,'सध्या अन्न, पाणी आणि हवा या मानवाच्या मूलभूत गरजा बनल्या आहेत. यासाठी जल, जंगल आणि जमीन यांचा समतोल राखणे गरजेचे आहे. भविष्यातील संकट ओळखून विद्यापीठ सध्या पाण्याच्या दृष्टीने स्वयंपूर्ण झाले आहे. पर्यावरण संवर्धनाच्या या कामात तरुणाईला सोबत घ्यायला हवे. त्यांना कसे प्रेरित करायचे, हे संपतराव पवार यांच्याकडून शिकले पाहिजे.' अध्यक्षीय भाषणात व्यंकाप्पा भोसले म्हणाले, 'महाराष्ट्रमध्ये आजही उपेक्षित, वंचित वर्ग मोठा आहे. पर्यावरण, निसर्ग आणि हवामानावर काम करत असताना वंचितांचा लढा मागे पडता कामा नाही. पर्यावरण चळवळ राबविणाऱ्या कार्यकर्त्यांनी वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठीही प्रयत्न केले पाहिजेत.' अनुराधा भोसले यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन पंडित कंदले यांनी केले. जयश्री कांबळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 MAY
पुढारी

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी.(गणित) एम.बी.ए. तसेच ऑनलाईन एम.बी.ए., एम.कॉम., आणि एम.एस्सी (गणित) आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० जून २०२५ पर्यंत असल्याची माहिती प्र.संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली. शिवाजी विद्यापीठाच्या www. unishivaji. ac. in या संकेतस्थळावर Distance Education लिंकवर प्रवेशाबाबतची जाहिरात उपलब्ध असून, http:/// sukapps. unishivaji. ac. in/ studentregistration/#/ login या ऑनलाईन लिंकवर आपला प्रवेश आजच निश्चित करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

2 6 MAY 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरातून अमेरिकेतील साधकांना योगाचे धडे

## शिवाजी विद्यापीठातील एम.ए. योगशास्त्राची पहिली बॅच पूर्ण; शिक्षण सुरू असतानाच रोजगाराची संधी

**कोल्हापूर : वैभव गोंधळी**

योगशास्त्राचे उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या योगप्रेमी, जिज्ञासूंसह योग क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाकडून २०२३-२४ या शैक्षणिक वर्षांपासून एम.ए. योगशास्त्र हा द्वैवार्षिक पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. पहिल्या बॅचमधील २० विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम



पूर्ण केला. त्यापैकी काही योग शिक्षक म्हणून नोकरीस लागले, तर काहींनी स्वतःचे प्रशिक्षण वर्ग सुरू केले आहेत. त्यापैकी दीप्ती पाटील या अमेरिकेतील साधकांनाही ऑनलाईन योगाचे धडे देत आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार अधिविभागाकर्फे २०२३-२४ मध्ये एम.ए. योगशास्त्र अभ्यसाक्रम सुरू करण्यात आला. योग क्षेत्रामध्ये व्यावसायिक कारकीर्द घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पदवीनंतर हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. योगशास्त्राचे उच्च शिक्षण उपलब्ध व्हावे आणि त्यातून रोजगारासाठी मनुष्यबळाची निर्मिती व्हावी, हा योगशास्त्र अभ्यसाक्रम मागे हेतू होता.

सुरुवातीलाच या अभ्यासक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. पहिली बॅच पूर्ण झाली. २० जणांनी हा अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यातील काही नोकरीला लागले, तर काहींनी स्वतःचे क्लासेस सुरू केले. त्यातील दीप्ती पाटील यांनी डिप्लोमा पूर्ण केला होता. आता एम.ए. झाल्यानंतर त्यांनी योगा क्लास सुरू केला. त्या कोल्हापूरमध्ये ऑफलाईन प्रशिक्षण देण्यासह देश-विदेशातील साधकांना ऑनलाईन पद्धतीने योगाचे धडे देत आहेत. नुकत्याच त्यांच्या अमेरिकेतील साधकांच्या पाच बॅच पूर्ण झाल्या.



या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्वतःचे आरोग्य चांगले राखता येईल. नोकरी व व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रमात शरीरशास्त्र, शरीरक्रिया विज्ञान, विविध प्राचीन आणि आधुनिक योग ग्रंथांतील हठयोग, शास्त्रीय योग, निसर्गोपचार, आयुर्वेदाचे सिद्धांत, योग तत्त्वज्ञान, पूरक चिकित्सा पद्धती, मानसशास्त्र, व्यक्तिमत्त्व विकास इत्यादी गोष्टींसह सर्वसमावेशक असा हा अभ्यासक्रम आहे. – डॉ. रामचंद्र पवार, संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग



एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रमामुळे शास्त्रोक्त योग व भारतीय परंपरा, ग्रंथ, वेद यांचे सखोल ज्ञान मिळाले. ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने योगाचे शिक्षण देत आहे. गेल्या पाच महिन्यांपासून अमेरिकेतील साधकांनाही शास्त्रोक्त पद्धतीने योग शिकवत आहे. धकाधकीच्या जीवनात मानसिक आरोग्य कसे उत्तम ठेवता येईल, हे योगाद्वारे लोकांपर्यंत पोहोचविण्याकडे कल आहे.
– दीप्ती पाटील, विद्यार्थिनी, एम.ए. योगशास्त्र